महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

मंगळवार ❖ १० डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६५ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडमध्ये



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सुशासन सुधारण्यासाठी महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर भर देऊन, केंद्राशी समन्वय वाढवून, जनता दरबार आणि इतर महत्त्वाच्या कामांना वेग देण्याचे आवाहन केले आहे. वॉररूमची कार्यक्षमता वाढविणे, पोर्टल्स अपडेट करणे आणि 'इज ऑफ लिव्हिंग'वर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले आहेत.

## देवेंद्र फडणवीस यांनी काय-काय सूचना केल्या?

**वेगवेगळ्या विभागाचे पोर्टल अपडेट करा. ते अधिक प्रभावी करा. त्यातून लोकांना शक्य तितक्या सेवा घरबसल्या लोकांना कशा मिळतील, यावर भर दिला पाहिजे. उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना मंत्रिमंडळ बैठकीत सन्मानित करण्यात येईल. सर्व संकेतस्थळ हे RTI फ्रेंडली करा. २६ जानेवारीपर्यंत यावर टार्गेट करा, अशी सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आता अ?क्शन मोडवर आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव यांना महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळात सरकारची दिशा काय असेल याबाबत स्पष्ट केले. पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकता यावर अधिक भर द्या, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. केंद्र सरकारचा पुरेपूर वापर राज्याच्या प्रगतीसाठी करून घ्या, अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा. यासाठी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या माध्यमातून स्वतंत्र कक्ष उभारा. वॉररूम आणखी कार्यक्षम करा. कोणते प्रकल्प त्यात असले पाहिजे, याची नव्याने रचना मुख्य सचिवांनी करावी. पहिली बैठक डिसेंबर अखेरीस व्हावी. एक वॉररूम पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी आहेच, पण दुसरी वॉररूम आता केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशिप योजनांसाठी असेल. त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत लाभ गतीने पोहोचले पाहिजे, अशी सूचना देवेंद्र फडणवीस यांनी केली. जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगाने हाती घ्या. हे कार्यक्रम सुरू झालेच पाहिजे, ते तळागाळात नेले पाहिजे. आपले सरकार पोर्टल पुन्हा नव्याने पूर्ण क्षमतेने चालवा. पालक सचिवांनी आपल्या जिल्ह्यात प्रवास तत्काळ सुरू करावे. आपल्या अनुभवाचा फायदा त्या-त्या जिल्ह्यांना करून द्या, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी सचिवांना केल्या.

# मंत्रिमंडळाचा शपथविधी लांबणीवर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुंबईः महायुती सरकारचा शपथविधी सोहळा आणि आमदारांनी शपथग्रहण केल्यानंतर आता सगळ्यांना मंत्रिमंडळ विस्ताराचे वेध लागले आहेत. या पार्श्वभूमीवर महायुतीच्या गोटातून एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. त्यानुसार, येत्या १४ तारखेला महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होण्याची दाट शक्यता आहे. महायुतीच्या नेत्यांनी यापूर्वीच हिवाळी अधिवेशनाच्या आधी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असे सांगितले होते. त्यानुसार आता १३ किंवा १४ डिसेंबरला महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडेल. मुंबईतील वर्षा बंगल्यावर रविवारी रात्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर मंत्रिमंडळ आणि खातेवाटपाच्या चर्चेचा वेग आला आहे.

मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप अंतिम होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी बैठक करून मंत्रिपदाबाबत अंतिम तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. रविवारी रात्री १२ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी शिवसेनेच्या जागांबाबत चर्चा केली.

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चर्चा करणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून चांगली खाती मिळवण्यासाठी प्रसंगी कठोर भूमिका घेणार असल्याची माहिती राष्ट्रवादीतील वरिष्ठ नेत्याने 'एबीपी माझा'शी बोलताना दिली.

एकनाथ शिंदे यांनी महायुती सरकारच्या शपथविधीपूर्वी गृहमंत्रीपदाची मागणी केली होती. मात्र, भाजपने त्याला नकार दिला होता. मात्र, शिवसेनेने गृहमंत्रिपदाची मागणी लावून धरली आहे. त्यामुळे शिवसेनेला गृहमंत्रीपद मिळणार की नाही, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, महायुती सरकारमध्ये शिवसेनेच्या वाट्याला १३ ते १४ मंत्रि?पदे येण्याची शक्यता आहे. भाजपकडून गृहखात्याऐवजी महसूल खाते शिवसेनेसाठी सोडले जाईल, अशीही चर्चा आहे. तत्पूर्वी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांच्या कामगिरीचे रिपोर्ट कार्ड मागवून घेतले होते. त्याआधारे शिवसेनेच्या ५ आमदारांचे मंत्रिपद नक्की मानले जात आहे. तर संजय राठोड आणि अब्दुल सत्तार यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची शक्यता आहे. १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे. या अधिवेशनात नवे मंत्रिमंडळ विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे देईल.



# धर्माच्या आधारावर आरक्षण देता येणार नाही - सर्वोच्च न्यायालय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दिल्ली** : पश्चिम बंगाल सरकारने न ओबीसी आरक्षणासंबंधी दाखल केलेल्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने महत्त्वाची टिपण्णी केली आहे. 'धर्माच्या आधारावर आरक्षण देता येणार नाही' असं कोर्टाने म्हटलं आहे.

यायालयाच्या निरीक्षणाला उत्तर देताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल म्हणाले की, सदरील आरक्षण हे धर्माच्या आधारावर दिलेले नाही. समाजाच्या मागासलेपणाचा विचार करुन देण्यात आलेले आहे. पश्चिम बंगालमध्ये २७ ते २८ टक्के अल्पसंख्यक समूदायाची लोकसंख्या असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पश्चिम बंगालमध्ये रंगनाथ आयोगाना मुस्लिम समाजाला १० टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली होती. हिंदू धर्मातील ६६ समूदायांना मागास म्हणून वर्गीकृत केल्यानंतर मुस्लिमांच्या आरक्षणाचा प्रश्न निर्माण झालेला होता. त्यामुळे मागास आयोगाने मुस्लिमांमधील इतर समूदायांना सरकारने मागासवर्ग म्हणून वर्गीकृत केले होते.

न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार सोमवारी पडली. कोर्टाने म्हटलं की, धर्माच्या आधारावर आरक्षण देता येणार नाही.

पश्चिम बंगाल सरकारचे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, पश्चिम बंगाल सरकारने अनेक जातींना ओबीसींमध्ये समाविष्ट केलं आहे. हायकोर्टाने हे अवैध म्हणत रद्द केलं होतं. सरकारी नोकऱ्या आणि राज्य शासनातील शिक्षण संस्थांमध्ये या समूदायांना आरक्षण देणं अवैध आहे, असं कोर्टाने म्हटलं होतं.

सोमवारी या प्रकरणाच्या सुनावणीवेळी कोर्टाने वकिलांकडून संपूर्ण प्रकरणाची विस्तृत माहिती मागवली. कपिल सिब्बल म्हणाले की, हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. यामुळे हजारो विद्यार्थी आणि नोकरीसाठी इच्छूक असलेल्यांवर याचा परिणाम होईल. त्यामुळे हायकोर्टाच्या निर्णयावर अंतरिम आदेश जारी करावेत, त्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती द्यावी. त्यानंतर आता या प्रकरणाची सुनावणी ९ जानेवारी रोजी होणार आहे.

# संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर


**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**- प्रतिनिधी**

केंद्र सरकारकडून नव्या आरबीआय गव्हर्नरची (गैँ घ्उदनेहदे) घोषणा करण्यात आली आहे. संजय मल्होत्रा पुढील आरबीआय गव्हर्नर असणार आहेत. पुढील तीन वर्ष ते या पदावर असणार आहेत. शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ १० डिसेंबर रोजी संपत होता. त्यानंतर केंद्र सरकाककडून हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ १० डिसेंबर रोजी संपत होता. दास यांना एक्स्टेन्शन मिळणार अशी चर्चा होती. मात्र, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीकडून सध्याला महसूल सचिव असलेल्या संजय मल्होत्रा यांची नियुक्ती नव्या आरबीआय गव्हर्नरपदी करण्यात आल्याचं जाहीर केलं गेलंय. संजय मल्होत्रा हे १९९० च्या बॅचे आणि राजस्थान केडरचे सनदी अधिकारी आहेत. त्यांनी कानपूरमधून कंप्यूटर विज्ञान मध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळवली आहे. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातून सार्वजनिक धोरणात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. संजय मल्होत्रा ??यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान, खाणी इत्यादींसह विविध क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव (महसूल) आहेत. त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिवपद भूषवले होते. संजय मल्होत्रा यांना राज्य आणि केंद्र सरकारमधील वित्त आणि कर आकारणी या क्षेत्राचा मोठा अनुभव आहे. ते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांच्या संदर्भात कर धोरण तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावतात.



## शिवसेनेचे माजी ठाणे जिल्हाप्रमुख
# रघुनाथ मोरे यांचे निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**- प्रतिनिधी**



**ठाणेः** शिवसेनेचे माजी ठाणे जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे यांचे आज दिर्घ आजाराने निधन झाले. ते ७६ वर्षाचे होते. दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या निधनानंतर रघुनाथ मोरे यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारली होती. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी प्रेरित होऊन त्यांनी त्या काळात शिवसेनेची ताकद वाढवली. शिवसेनेच्या प्रत्येक आंदोलनात ते नेहमीच। सक्रिय होते.

जिल्हाप्रमुख पदाची धुरा सांभाळताना अचानक त्यांचा अपघात झाला. त्यांना मोठी दुखापत झाली होती. तेव्हापासून ते राजकारणापासून अलिप्त होते. काही दिवसांपूर्वीच रघुनाथ मोरे यांचा मुलगा मिलिंद यांचा विरार येथील एका रिसॉर्टमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. रघुनाथ मोरे यांच्या पश्चात त्यांचे भाऊ, पुतणे, मुली, नातवंडे असा परिवार आहे.

दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे अत्यंत जवळचे सहकारी म्हणून मोरे यांची ओळख होती. दिघे यांच्या निधनानंतर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानंतर रघुनाथ मोरे यांनी ठाण्याची शिवसेना ताकतीने वाढवली. २००२ साली ठाणे महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचे ६० पेक्षा जास्त नगरसेवक त्यांनी निवडून आणले. शिवसेनेच्या फुटीनंतरही रघुनाथ मोरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नाही. आज दुपारी ठाण्याच्या जवाहर बाग स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते राजन विचारे, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.



# वापरापूर्वीच भेगांची 'समृध्दी'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

मुंबई नागपूर समृद्धी महामार्गाचा शेवटच्या टप्प्या चे काम जोरात सुरु आहे. हा महामार्ग इंगतपुरी ते नागपूर सुरु झाला आहे. मात्र सध्या इंगतपुरी ते भिवंडी या महामार्गाचे काम सुरु आहे. हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून कॉक्रीट रस्ता जागोजागी उखडला आहे. या कॉक्रीट करणात सिमेंट सह अन्य मटेरियल बोगस वापरल्याने या कॉक्रीट रस्त्यावर खडी निखळलेली दिसते, जागोजागी खडे व सफाईदार पणा नसल्याने हा रस्ता सुरु झाल्यास आपघातांना निमंत्रण ठरेल. करोडो रुपये जमीन संपादन व करोडो रुपये रस्त्यासाठी खर्च होत असताना. ठेकेदारांना मालामाल करताना या रस्त्याचे काम मात्र निकृष्ट होत असल्याची तक्रार स्थानिक करत आहेत.

# ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार 'फार्मर आयडी'

> जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रिस्टॅक ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे प्रत्यक्ष काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू करावे
>
> - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता दि. ०९**

:ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत विविध योजनांचा लाभ जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रिस्टॅक ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे प्रत्यक्ष काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिले.

केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार

## ॲग्रिस्टॅक योजना यशस्वी राबविण्यासाठी प्रशासन सज्ज

ॲग्रिस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी मदत होणार आहे. ॲग्रीस्टॅक संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गट विकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांचे नियोजन व कामकाजाकडे नियंत्रण असणार आहे, अशी माहिती कृषी विकास अधिकारी एम एम बाचोटीकर यांनी दिली. सर्व ग्रामपंचायतींमार्फत कॅम्प नियोजन करण्यात येणार असून शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करून देणार आहेत. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच निर्मितीमध्ये पथकातील कर्मचारी प्राथमिक जबाबदारी पार पाडणार आहेत.

कृषि क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रिस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषि उपक्रमांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषि-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होणार आहे.

विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना लाभ देताना आधार प्रणालीचा वापर करून लाभार्थीची ओळख पटविण्यात येते. तसेच महसूल विभागाने त्यांच्याकडील अधिकार अभिलेखाचे तसेच गाव नकाशांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्थेने राज्यातील जमिनींचे भू-संदर्भीकरण (जिओ रेफरन्सिंग) करुन दिले आहे. यामुळे शेत जमिनीची इत्यंभूत अद्ययावत माहिती डिजिटाईज स्वरुपात तात्काळ उपलब्ध होणार असून ॲग्रिस्टॅक ही योजना यशस्वीपणे राबवण्यासाठी शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.




### महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# रिपब्लिकन सेनेच्या वतीने विविध उपक्रम



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(कुणाल म्हात्रे) :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना रिपब्लिकन सेनेतर्फे डोंबिवलीतील त्यांच्या पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार घालून आदरांजली वाहण्यात आली. रिपब्लिकन सेनेच्या महिला कमिटीतर्फे दिनदयाळ चौक मित्र मंडळाच्या विद्यमाने दिनदयाळ चौक, डोंबिवली पश्चिम स्टेशन बाहेर डोंबिवलीतून दादर चैत्यभूमी येथे जाणाऱ्या भिमअनुयायांना मोफत बिस्किटे व पाणी वाटप करण्यात आले. तत्पूर्वी डोंबिवली पश्चिम स्टेशन परिसरात तथागत भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना विष्णुनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.विनय पाटील, डॉ.मंजू पाटील, प्रशांत किर, शारदा पवार, चीफ तिकीट इन्स्पेक्टर सेंट्रल रेल्वे झोन प्रेमानंद, भिमराव खंदारे, माणिक जगताप, रितेश म्हात्रे उपस्थित होते. बौद्ध उपसिका कमल ससाणे यांच्या हस्ते त्रीसरण, पंचशील, बुध्दवंदना घेऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व गायक माणिक गोरे यांनी आपल्या पहाडी आवाजात गीत गायनातून महामानवास आदरांजली वाहिली.माजी स्थायी समिती सभापती दिपेश म्हात्रे यांनी सुद्धा या कार्यक्रमास धावती भेट घेऊन उपस्थिती दर्शिवली.

हा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व कार्यकर्ते दादर चैत्यभूमी येथे रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय नेते आनंदराज आंबेडकर यांची अभिवादन सभा ऐकण्याकरिता जाण्यासाठी रवाना झाले. तेथे पोहोचल्यानंतर टेम्पो मध्ये आणण्यात आलेल्या सुमारे दोन हजार भीम अनुयायांना रिपब्लिकन सेनेतर्फे पाणी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजक रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष तथा ठाणे जिल्हा निमंत्रक आनंद नवसागरे व डोंबिवली महिला आघाडी अध्यक्ष सुरेखा जाधव होते.तर निमंत्रक म्हणून राहुल नवसागरे (डोंबिवली विधानसभा अध्यक्ष), युवराज वाटुरे (डोंबिवली शहर संघटक), संदीप हेरोडे (आय. टी. सेल प्रमुख,कल्याण डोंबिवली, रिपब्लिकन सेना) हे होते. या कार्यक्रमास रमेश ढगे, कपिल सोनावणे, देवानंद खिल्लारे, विनायक जगताप, युवराज साळवी, योगेश बनसोडे, बॉबी बौद्ध, नेताजी जाधव, अजय बैसाने, जया कदम, ललिता नवसागरे, करुणा जाधव, कुसुम उधागे, लक्ष्मी भालमोडे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### कल्याण सिटीझन फोरमतर्फे

# कल्याण भुषण व कल्याणरत्न पुरस्कारांचे वितरण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण मधील ज्येष्ठ विचारवंत स्वर्गीय कॉम्रेड दत्ता केळकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्यातील विविध गुणांच्या पैलूंचा सन्मान करण्याच्या हेतूने कल्याण सिटीझन फोरमतर्फे १५ डिसेंबर रोजी अग्रवाल कॉलेज कल्याण येथे सायंकाळी ५ वाजता कल्याण भूषण व कल्याण रत्न पुरस्काराचे वितरण समारंभ आयोजित केला आहे.

हा समारंभ ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार पद्मश्री कुमार केतकर यांच्याहस्ते संपन्न होणार असून या वेळेस विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र कोरोना नियंत्रक प्रमुख डॉ. संजय ओक हे उपस्थित राहणार असून ज्येष्ठ कामगार नेते विश्वास उडगी, राजन राजे हे देखील उपस्थित राहणार आहेत. यावेळी सामाजीक व शैक्षणिक क्षेत्रासाठी डॉ. साद काझी आणि ज्येष्ठ नाटयदिग्दर्शक रवीन्द्र लाखे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष डॉ. विजय पंडित यांनी दिली.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित

**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|
| १ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


### तेथे कर माझे जुळती

# शहीद वीर नारायण सिंह



छत्तीसगडच्या पहिल्या शहिदाच्या रूपाने स्वातंत्र्यासाठी प्राणाहुती देणारे पहिले वीर म्हणून इतिहासात ज्यांचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे ते आहेत वीर नारायण सिंह ! त्यांचा जन्म १७९५ मध्ये बलौदा बाजारच्या सोनाखान या छोट्याशा गावात झाला . त्यांच्या आईचे नाव राणी दुर्गादेवी व वडिलांचे नाव राजा दलपत असे होते .सोना खान गावात नारायण सिंह यांच्या पूर्वजांची ३०० गावांची जमीनदारी होती . त्यांचा आपल्या प्रजेवर भरवसा होताआणि प्रजेचे त्यांच्यावर अतोनात प्रेम होते .ते अतिशय परोपकारी होते. प्रजेसाठी त्यांनी तलाव बांधून दिले. वृक्षारोपण यासारखे लोक कल्याणकारी कार्यकम त्यांनी राबवले.१८५६ मध्ये छत्तीसगड मध्ये भयंकर दुष्काळ पडला .आणि सर्व लोक धान्यासाठी तळमळू लागले. भुकेने तळपणाऱ्या व मरणासन्न झालेल्या लोकांसाठी तेथील व्यापारी धान्य देण्यास तयार नव्हते नारायण सिंह यांनी कस डोल येथील अन्नधान्याच्या गोदामाची लूट करून भुकेलेल्या लोकांना धान्य वाटून दिले .

तथापि सावकारांनी त्यांची तक्रार इंग्रजांकडे नोंदवली .वीर नारायण सिंह डगमगले नाहीत इंग्रजांशी त्यांनी सामना दिला.२४ ऑक्टोबर १८५६ रोजी संबलपूर येथे त्यांना अटक करण्यात आली .


रायपूर येथील तुरुंगात डांबण्यात आले. २८ ऑगस्ट १८५७ रोजी नारायण सिंह यांची त्यांच्या साथीदारा सह तुरुंगातून सुटका झाली. नारायण सिंह यांच्या नेतृत्वा खाली ५० ०सैनिकांची फौज तयार करण्यात आली .

सदर माहिती ब्रिटिश उपायुक्त स्मिथ यास मिळाली .तत्क्षणी स्मिथने लष्करी कारवाई केली.२९ नोव्हेंबर १८५७ रोजी स्मिथचे सैन्य सोना खान गावात येऊन राहिले.मात्र सोनाखान गाव रिकामे करण्यात आले होते . वस्तीतील सर्व लोक गाव सोडून निघून गेले होते. स्मिथच्या सैन्याला राग आला. रागाच्या भरात सारा गाव जाळून टाकला. इंग्रज उपायुक्त स्मिथ परत येत असताना नारायण सिंह यांनी टेकडीवरून गोळीबार केला . सदर कारवाईने इंग्रज सैन्य घाबरले . स्मिथ पळून गेला. स्मिथने २डिसेंबर १८५७ रोजी मोठ्या संख्येने सैन्य बोलावले. ब्रिटिश सैन्याने संपूर्ण टेकडीला चारही बाजूने वेढा दिला. क्रांतिकारकांचा दारूगोळा संपल्याने नारायण सिंह यांच्या सैन्याचा टिकाव लागेनासा झाला. नारायण सिंह यांना पकडण्यासाठी इंग्रजांनी पूर्ण ताकद लावली. त्यांनी जनतेवर अनन्वित अत्याचार करायला सुरुवात केली. हे जुलूम पाहून त्यांच्या पत्नीने त्यांना आत्म समर्पण करायला सांगितले.

त्यानुसार प्रजेच्या हितासाठी नारायण सिंह यांनी आत्मसमर्पण केले.

त्यांना अटक करण्यात आली.१० डिसेंबर १८५७ रोजी रायपूर शहराच्या मध्यभागी असलेल्या चौकात त्यांना फाशी देण्यात आली . या हुतात्म्याच्या स्मरणार्थ छतीसगडच्या जनतेने या चौकाचे 'जयस्तंभ' असे नामकरण केले आहे.अशाप्रकारे ब्रिटिश हुकुमशाही ला आव्हान देणारे पण जनते साठी आत्मसमर्पण करणाऱ्या अद्वितीय नेत्याच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या स्मृतीस कोटी कोटी प्रणाम !

मौत रुक नहीं सकती वक्त मुकर्रर हो जाने से । शान घट नहीं सकती वतनपर मिट जानेसे ।



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

### अनधिकृत टपऱ्या स्टॉल्ससाठी

# नागरिकांची गरज असणारी सार्वजनिक शौचालय तोडल का ?



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** अनधिकृत टपऱ्या स्टॉल्ससाठी नागरिकांची गरज असणारी मुतारी तोडली का असा सवाल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे केडीएमसी आयुक्तांना केला आहे.

कल्याण पश्चिमेत सहायक पोलीस आयुक्त यांच्या कार्यालय समोर कोर्टाच्या भिंतीला लागुन फुटपाथवर अनधिकृत पणे स्टॉल टाकण्यात आले आहेत.

हे स्टॉल्स त्या फुटपाथवर टाकण्यात आले आहेत ज्या ठिकाणी सार्वजनिक मुतारी होती. कल्याण महापालिका प्रशासनाने फुटपाथवर नागरिकांच्या सुविधा साठी असलेला मुतारी तोडून टाकली परंतु त्या ठिकाणी अनधिकृतपणे टाकलेले स्टॉल्स कोणाच्या आशिर्वादाने टाकले आहेत हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे या स्टॉल वर त्वरित कारवाई करण्यात येऊन नागरिकांच्या सोयीसाठी याठिकाणी मुतारी उभारण्याची मागणी साळवे यांनी केली आहे.

### माणगाव तालुका कृषि अधिकारी किरण पडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली

# आमडोशी येथे जागतिक मृदा दिन संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**

बोरघर(विश्वास गायकवाड) तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव यांच्या मार्फत मा. तालुका कृषी अधिकारी श्री. किरण पडवळकर यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक मृदा दिनानिमित्त मौजे - आमडोशी येथे शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, रेपोली येथील डॉ.प्रशांत निगडे, यांनी माती परिक्षनाचे महत्व, माती संवर्धन कशा प्रकारे करावयाचे याबाबत उपस्थित शेतकऱ्याना मार्गदर्शन केले.



श्री.सुयश नलावडे कृषी पर्यवेक्षक यांनी माती नमुना कसा काढायचा व मातीचे गुणधर्म, अन्नद्रव्यांचे प्रमाण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक श्री.अमोल गावडे यांनी जमीन आरोग्य पत्रिका यांचे बदल सविस्तर माहिती दिली, तसेच उपस्थित शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्व समजावून सांगितले. तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन कृषी सहाय्यक श्री. अमोल गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन रायगडचा राजा शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष श्री.रमेश शिगवण यांनी केले. कार्यक्रमास कृषी पर्यवेक्षक श्री. कृष्णा शिंदे,श्री. सुयश नलावडे, कृषी सहाय्यक श्री. विजय भाकरे व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय शालेय आटयापाटया स्पर्धेत सिध्दार्थ विद्या मंदिरचे यश



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली महानगर पालिका जिल्हास्तरीय आट्यापाट्या स्पर्धेत सिद्धार्थ विद्या मंदिर, कल्याण पूर्वच्या शाळेचा १४ वर्षाखालील आट्यापाट्या मुलांचा संघ विजेता ठरला.

कल्याण डोंबिवली महानगर पालिका जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत जिल्हास्तरीय आट्यापाट्या स्पर्धा रविवारी बी के बिर्ला महाविद्यालय, कल्याण पश्चिम या ठिकाणी पार पडल्या. या स्पर्धेत सिद्धार्थ विद्या मंदिर शाळेतील माध्यमिक विभागाच्या १४ वर्षाखालील मुलांचा संघ विजेता ठरला असून विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. हा संघ १८ डिसेंबर रोजी पार पडणाऱ्या मुंबई विभागीय स्पर्धेसाठी कल्याण डोंबिवली महापालिकेचे प्रतिनिधित्व करणार आहे.संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना चाळसे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी विजयी संघाचे, संघ व्यवस्थापक दिलीप गायकर, प्रविण खाडे, संघाचा मार्गदर्शक व शाळेचा माजी विद्यार्थी सुशांत सोनवणे व शुभम गराडे यांचे विशेष अभिनंदन करुन विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विजेत्या संघाचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्रिडा विभागाचे पर्यवेक्षक प्रविण कांबळे, पंचप्रमुख अविनाश नलावडे, खेळप्रमुख महादेव क्षीरसागर यांनी अभिनंदन केले.

# हर्षल सरोदे यांनी सायकलवारीने पंढरपुर ते घुमान यात्रा केली पूर्ण





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** श्री क्षेत्र पंढरपुर ते संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची कर्मभूमी आणि त्यांच्या वास्तव्यामुळे पावन झालेले पंजाब मधील घुमान गाव पर्यंत भव्य रथयात्रा आणि सायकल यात्रा ही दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सुरू करण्यात आली होती. या सायकल वारीत डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये राहणाऱ्या ४८ वर्षीय हर्षल सरोदे यांनी भाग घेवून यशस्वीपणे २३ दिवसात एकूण २ हजार ६७४ किलोमीटर अंतर पार करून पूर्ण केली. या सायकल यात्रेसाठी श्री क्षेत्र पंढरपुर येथून अंदाजे १०० जणांनी सुरवात केली होती मात्र हर्षल यांनी सलग मदतीला असणाऱ्या वाहनाची मदत न घेता त्यांनी ही यात्रा पूर्ण केली. विशेष म्हणजे हर्षल यांच्या सायकल मध्ये कधी कधी प्रॉब्लेम निर्माण झाले होते पण अनेक जण त्यांच्या मदतीला येत असत.

हर्षल सरोदे यांनी यापूर्वीही अनेकदा लांब पल्ल्यांच्या सायकल फेऱ्या पूर्ण केल्या आहेत. याबद्दल व इतर सामाजिक क्षेत्रात कामाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या मुलगा शुभम हा दिव्यांग असून त्याला अधून मधून फिट येत असतात, असे असतानाही आणि काही वर्षापूर्वी त्यांच्या एका हुषार मुलाचे अपघाती वॉटर पार्क मध्ये निधन झाल्यावर त्यांनी धैर्य सोडले नाही. त्यांच्या मुलाच्या चांगल्या भविष्यासाठी आणि तो या आजारातून बरा होवो या इच्छेने त्यांनी ही सायकल वारी केली आहे. त्यासाठी त्यांचे पती ललित यांनी घरात थांबून मुलाची सेवा करून त्याना सहकार्य केले. एमआयडीसी निवासी मध्ये त्यांच्या पुढाकाराने एव्हरग्रीन सायकल प्रेमी असा एक ग्रुप तयार केला असून आरोग्य व पर्यावरण राखणे हा त्यांच्या मुख्य उद्देश आहे. त्यात ते ज्येष्ठ महिला, घरकाम करणाऱ्या महिला, लहान मुले/मुली आणि विकलांग मुलांना सायकल शिकवण्याचे धडे देत असतात. अशा या धाडसी आणि सामाजिक कार्य करणाऱ्या हर्षल सरोदे या महिलेचा पद्मश्री पुरस्कार विजेते गजाननराव माने यांच्या हस्ते एमआयडीसी, मिलापनगर मधील वंदेमातरम उद्यानात करण्यात आला.

यावेळी स्वरूपीणी महिला मंडळाच्या अध्यक्षा वर्षा भट, राजू नलावडे, सरोज विश्वामित्रे, राजश्री खैरे, योगिता थोटांगे, कल्पना बोंडे आदीजण उपस्थित होते.





१० डिसेंबर २०२४ मंगळवार

**मेष**
बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. प्रेमी युगुलांसाठी दिवस चांगला जाणार आहे. तुम्हाला इच्छेनुसार निकाल मिळेल.

**वृषभ**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल.वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

**मिथुन**
तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कर्क**
तुम्हाला तुमचा व्यवसाय इतर ठिकाणी हलवायचा असेल, तर ती जागा काळजीपूर्वक तपासा. एखाद्यासोबत भागीदारीसाठी दिवस चांगला जाईल.

**सिंह**
सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.

**कन्या**
तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांसाठी दिवस सामान्य असेल.

**तूळ**
नोकरदार महिलांसाठीही दिवस चांगला राहील.यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील.

**वृश्चिक**
राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते.नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे.

**धनु**
करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. कुटुंबासोबत वेळ घालवाल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**मकर**
तुमचे अनुसरण करतील. आज व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.घरातील ज्येष्ठांचे मत अवश्य घ्या.

**कुंभ**
घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल आणि तुमचे व्यवहारही जलद होऊ शकतात. जबाबदारी मिळू शकते जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**मीन**
महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे जे कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत आहेत. कोणतेही काम करताना घाई करू नका.

# रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक



गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्राल याच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले.

सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईल वर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळयांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**- श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कल्याणातील फडके मैदान
# लग्न, जत्रा यासाठी न देण्याबाबत आयुक्तांना साकडे



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण पश्चिमेतील वासुदेव बळवंत फडके मैदान या खेळाच्या मैदानात कोणत्याही लग्न, जत्रा यांना परवानगी देऊ नये अशी मागणी माजी नगरसेवक, शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी पत्राद्वारे केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

कल्याण डोंबिवली मनपाच्या फडके मैदानात लग्न, इतर समारंभ साजरे करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. या ठिकाणी बगीचा देखील असून त्या अनुषंगाने सकाळ संध्याकाळ क्रिडाप्रेमी नागरिक, जेष्ठ नागरिक, लहान मुले मैदानात खेळाचा आनंद घेत असतात. परंतू त्या ठिकाणी लग्न, जत्रा ,इतर कार्यक्रम करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. आजूबाजूच्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास होतो. यासर्व गोष्टींचा विचार करता हे मैदान कोणालाही भाड्याने देऊ नये अशा आशायाचे पत्र शिवसेना उपशर प्रमुख मोहन उगले यांनी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त यांना दिले आहे.

'या संदर्भात मालमत्ता विभागाचे उप आयुक्त रमेश मिसाळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मैदान भाडेतत्त्वावर देणे बाबत महासभेचा ठराव असून कार्यक्रम निमित्ताने मैदान घेतलेल्यांनी संदर्भीत ठिकाणी कचरा साफ न केल्यास अटी शर्ती नुसार अटीचा भंग केल्यास डिपॉझिट रक्कम जप्त करतो असे संपर्क साधला असता सांगितले.'

## एलिफंटा ते गेटवे ऑफ इंडिया
# पोहत बाबासाहेबांना अनोखी मानवंदना
## जलतरणपटू वेदांती म्हात्रेने पार केले १२ किमीचे सागरी अंतर




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी जलतरणपटू वेदांती म्हात्रे (१२) हिने एलिफंटा ते गेटवे ऑफ इंडिया हे १२ किमीचे सागरी अंतर पार करत बाबासाहेबांना अनोखी मानवंदना दिली.

कल्याण पूर्वेकडील लोकधारा सोसायटीमध्ये राहणारी वेदांती लोक कल्याण पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेत आहे. उन्हाळी शिबिरामध्ये प्रशिक्षण घेत असताना तिला स्विमिंगची आवड निर्माण झाली. त्यातूनच एलिफंटा ते गेटवे ऑफ इंडिया हे १२ किमी सागरी अंतर पार करण्याचा निर्णय तिने घेतला.

उरण येथे सागरी प्रशिक्षक संतोष पाटील यांनी तिला यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रोज तीन-तीन तास सराव करायला वेदांतीने सुरुवात केली. रोज संध्याकाळी सहा ते रात्री आठ वाजेपर्यंत तिचा सराव चालायचा.

सागरी अंतर पार करण्याची तारीख निश्चित झाली. तेव्हापासून वेदांतीने सकाळी सहा ते सकाळी अकरा तर कधी सकाळी सहा ते नऊ अशा पद्धतीने सराव सुरु केला. शुक्रवारी सकाळी पाच वाजून पाच मिनिटांनी वेदांतीने सागरी अंतर पार करायला सुरुवात केली. तिने हे अंतर चार तास ८ मिनिटात पोहून पार केले. डोंबिवलीतील जिमखान्याचे प्रशिक्षक विलास माने आणि रवी नवले यांनी देखील तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले.सकाळी सहा वाजता सरावासाठी जात असल्याने तिला खूप थंडी वाजायची आणि पाणीही थंड होते. सराव केल्यामुळे तिच्या हातापायावर फोड आले होते. तरीदेखील औषधोपचार घेऊन चार तासांचा सराव केल्याचे वेदांतीची आई ज्योती यांनी सांगितले.

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात
# संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**
संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय व तहसीलदार कार्याल य येथे संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी तहसील दार किशोर मराठे, सुमेध राऊत, सुधीर आढाव यांच्यासह श्री संताजी सहाय्यक संघ,ठाणे आणि संताजी महाराज सेवा प्रतिष्ठान, ठाणे संस्थेचे जयवंत रसाळ , विलास घोंगते, सदाशिव पिंगळे, किरण चौधरी, दिगंबर घाटकर, कमलाकर शेलार, शशिकांत धामणे, राम जाधव ,संतोष मोहळे, प्रदीप वैरागी, एकनाथ वाव्हळ, किशोर मेहेर, सुधीर राऊत, रमेश बोरसे, रमेश पाटील, पूनम थोरात, राणी साळसकर, पुष्पलता रहाटे आदी उपस्थित होते.

# जीवनदीप मध्ये पार पडल्या आंतर महाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग टुर्नामेंट







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**गोवेली(प्रतिनिधी) :**
युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई ठाणे झोन क्रिडा समिती आणि जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली आयोजित दि.७ आणि ८ डिसेंबर २०२४ रोजी इंटर कॉलेजिएट पॉवरलिफ्टिंग टूर्नामेंटचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष व महिला या दोन गटात पावर लिफ्टिंग टूर्नामेंटचे आयोजन करण्यात आलं होतं.

या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले संजय सरदेसाई (सचिव महाराष्ट्र पावर लिफ्टिंग असोसिएशन) राहुल अकुल(ठाणे झोन सचिव) यज्ञेश्वर बागराव(ठाणे झोन सचिव) देवदत्त भोईर (अध्यक्ष ठाणे पावर लिफ्टिंग असोसिएशन)प्रा. नवनाथ गायकर, व प्रा. सुरेश चेडे (निवड समिती पॉवर लिफ्टिंग स्पर्धा मुंबई विद्यापीठ) प्रमोद बोराडे( मुंबई विद्यापीठ प्रतिनिधी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती या स्पर्धेसाठी एकूण ३४० स्पर्धक सहभागी झाले होते.

यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली उल्लेखनीय कामगिरी

(मुले)

१) ५९ किलो वजनी गटात विराज पावसकर यांनी मिळालेले कांस्य पदक
२) ७४ किलो वजनी गटात मोरेश कार्ले याने मिळवले सुवर्ण पदक
३)७४ किलो वजनी गटात कल्पेश तांडेल रौप्य पदक
४)८३ किलो वजनी गटात प्रांजल पाटेकर सुवर्णपदक
५) ९२ किलो वजनी गटात विवेक सांबरे रौप्य पदक
६)१०५ किलो वजन गटात सिकंदर यादव रौप्य पदक
७)१२० किलो वजनी गटात कार्तिक याने मिळवले रौप्य पदक
८) ऋषिकेश फुलोरे ८३ किलो वजनी गटात कांस्य पदक

४) ६३ किलो वजनी गटात दिव्या शिरोशे सुवर्णपदक याचप्रमाणे विशेष म्हणजे मुले आणि मुली या दोन्ही संघाचे सांघिक विजेतेपद गोवेली महाविद्यालयास मिळाले.

यावेळी या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले संजय सरदेसाई (सचिव महाराष्ट्र पावर लिफ्टिंग असोसिएशन) राहुल अकुल(ठाणे झोन सचिव) यज्ञेश्वर बागराव (ठाणे झोन सचिव नितीन कुडाळकर साहिल उत्तेकर संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे. संस्थेच्या संचालिका स्मिता घोडविंदे संचालक प्रशांत घोडविंदे. प्राचार्य डॉ. के. बी. कोरे. उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे. क्रीडा विभाग प्रमुख मोहनीश देशमुख या स्पर्धेसाठी यांचा विशेष सहकार्य लाभलं या स्पर्धेसाठी पंच म्हणून ज्यांनी काम केलं ते आनंत चाळके, सूर्यकांत गर्दे,राजेश पाटील, शरद जाधव, काजल भाकरे,स्वप्नील पाटील, देवदत्त भोईर, विनायक कारभारी, अभिजित गुरव, जितेंद्र यादव,राजेश शिर्के, विशाल मुळे, अमोल कडूसकर, कमलाकर घोडविंदे, प्रशांत धुमडे, जितेंद्र यादव, सुश्मिता देशमुख यांचे विशेष सहकार्य मिळालं तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी तसेच क्रीडा विभागाचे विद्यार्थी देखील मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. सतीश लकडे व प्रा. विजय सोनार यांनी केले.अशा या आनंदमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

# रमझान शेख यांच्या नेतृत्वात शेकडो महिलांचा राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :** राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षामध्ये तळोजा विभागातील शेकडो महिलांनी पक्षामध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते रमझान शेख यांच्या माध्यमातून हा पक्षप्रवेश सोहळा महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी पनवेल महिला जिल्हाध्यक्ष राजश्री कदम, खारघर शहराध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, ग्राहक संरक्षण जिल्हाध्यक्ष कृष्णा मर्डेकर, जिल्हा संघटक अमीर शाह मीरू, तुफेल खान जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग, खारघर शहर उपाध्यक्ष प्रवीण वारे, युवा कार्यकर्ते समीर शेख, मिराज शेख, इसराइल शेख आदी उपस्थित होते. यावेळी तरन्नुम सय्यद समद अली यांना महिला जिल्हा कार्याध्यक्ष, शाहीन खान यांना महिला जिल्हा सरचिटणीस, रुक्सार शेख यांना महिला तळोजा शहर फेस २ अध्यक्ष पदांचा कारभार सुपूर्त करण्यात आला. यावेळी इतरही कार्यकर्त्यांना पक्षाच्या अनेक जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

# मुरबाड पोलीस वसाहतीच्या छतावरुन उडी मारून पोलीस हवालदाराची आत्महत्या

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(दिलीप पवार) :** मुरबाड पोलिस ठाण्या लगत असलेल्या पोलिस वसाहतीच्या इमारती वरुन रात्रपाळीला

असणाऱ्या एका पोलिस हवालदाराने दि ८ डिसेंबर २०२४ रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास छतावरून उडी मारून आत्महत्या केल्याने मुरबाड पोलिस ठाण्यात खळबळ उडाली.

या आत्महत्येचे कारण अजुन अस्पष्ट असुन तीन ते चार महिन्यापूर्वीच हा कर्मचारी मुरबाड पोलिस ठाण्यात कार्यरत झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.याबाबत सविस्तर वृत्त असे की मुरबाड पोलिस ठाण्यात रात्रपाळी साठी तैनात असलेले पोलिस हवालदार. नामदेव मुरलीधर चारसकर (४५) बक्कल क्र.२९११ याने पोलिस ठाण्या शेजारी असलेल्या पोलिस वसाहतीच्या इमारती वरुन रात्री पावणे अकराच्या सुमारास कामावर तैनात असताना उडी मारून आत्महत्या केली.रात्रपाळीला



पोलिस ठाण्यात हजर असलेले ठाणे अंमलदार बाळासाहेब भोर व कर्मचाऱ्यांनी तात्काळ वरिष्ठांना कळवून घडलेला प्रकार कळवला.मुरबाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यापूर्वीच या कर्मचाऱ्याने प्राण सोडल्याचे समोर आल्याने त्यांचे शवविच्छेदन करून त्याच्या कुटुंबियांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आला. मात्र आत्महत्येचे नेमके कारण अजुन सामोरं न आल्याची माहिती मुरबाड पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मनोज कामत यांनी दिली. मात्र या घटने मुळे आत्महत्या नेमक्या कुठल्या कारणास्तव केली याबाबत विवीध प्रकारची चर्चा सुरु आहे.

# अलिबाग येथे पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलाईझर यांच्या सहकार्याने रविवारी ( दि. १५) अलिबाग येथे रायगड जिल्ह्यातील पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

चिंतामणराव केळकर विद्यालय, चेंढरे - अलिबाग येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत दैनिक लोकमत चे संपादक अतुल कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सागर मुंदडा मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी भारत रांजणकर ९२२६१५२४८९, राजेश भोस्तेकर ९८८१८७८७३२ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी केले आहे.

# श्री दत्तजयंती निमित्त गिरगांव येथे नाम सप्ताहाचे आयोजन



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
श्री दत्तजयंती नाम सप्ताहात, भजन परमानंदात तृप्त होऊन देवरुप होता येते. श्री गुरुदत्त महाराजांवर प्रेम करणे हे सामान्य नसून परमेश्वराचे नियोजित असंभव कार्य करता येते.

नाम स्मरणाने आत्मसुखाच्या प्राप्तीकरिता आपल्या कुंभारवाडा विभागात जनतेच्या कल्याणार्थ श्री दत्त कृपेनें गुरुवर्य ह.भ.प. वैकुंठ वासी श्री लक्ष्मण महाराज वाकचौरे व ह. भ. प. वैकुंठवासी श्री मधुकर वेताळे महाराज दापूरकर यांच्या आशीर्वादाने व ह. भ. प. राहुल महाराज पवार अमरापूरकर यांच्या मार्गदर्शनाने गेली ८६ वर्षे अखंड हरिनाम सप्ताह रुजू आहे. अश्या ह्या समाजप्रबोधनाच्या ईश्वरी कार्यात सर्वांनी सहभागी होऊन हा नामसप्ताह महोत्सव मोठ्या आनंदाने, ऐश्वर्याने साजरा करण्याकरिता सहकार्य करावे असे मंडळाचे अध्यक्ष श्री दीपक राजू दुर्गे, उपाध्यक्ष श्री आकाश अनिल कांबळे, कार्याध्यक्ष श्री मनोज अशोक आदाटे, चिटणीस श्री महेश बाळाराम घारे, उप कार्याध्यक्ष श्री साहिल विजय कांबळे, खजिनदार श्री मनोहर विश्वनाथ जाधव, उप खजिनदार श्री हार्दिक महेश गोहील, सरचिटणीस श्री अविनाश मनोहर घाग, सदस्य श्री राहुल सुरेश उनवरकर उप चिटणीस श्री निलेश किशोर जाधव आणि समस्त कार्यकर्ते यांनी विंनती केली आहे.

नामसप्ताह कालावधीत दिनांक ०७/१२/२४ पासून १४/१२/२४ रात्री ०९०० ते ११०० पर्यंत ह.भ.प. श्री भगवान महाराज आव्हाड, अश्विनीताई म्हात्रे, संगीताताई काठोळे, साईमहाराज गोळे,श्री आकाश महाराज यादव, श्री साहिल महाराज यादव, श्री मारुती रिंगे महाराज, श्री आदित्य महाराज झगडे आणि श्री राहुल महाराज पवार या नामवंत कीर्तनकारांचे सुमधुर - श्रवणीय कीर्तन आणि प्रवचन सादर होणार असून विभागातील श्रोत्यानी उपस्थित राहून आस्वाद, आनंद घ्यावा. दिनांक १५/१२/२४ रोजी पालखी मिरवणूक सोहळा आयोजित करण्यात आला असून विभागातील सर्व दत्तभक्तांनी उपस्थिती दर्शवावी आणि महाप्रसादाचाही लाभ घ्यावा.

मंडळाच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभाग कार्यालय, मेंटेनन्स / घनकचरा व्यवस्थापन, व्ही पी रोड पोलीस ठाणे, वाहतूक विभाग कार्यालय आणि विभागातील वर्गणीदार, देणगीदार,भारतीय जनता पार्टी - शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, समाजसेवक, हितचिंतक आणि समस्त भक्त भाविकांचे मनःपूर्वक आभार.. तसेच विभागातील मृत पावलेल्या ज्ञात - अज्ञात व्यक्तींना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# परिवहन विभागात ऑनलाईन फेसलेस पद्धत कार्यान्वित

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**रायगड(प्रतिनिधी) :**
परिवहन विभागाद्वारे ऑनलाईन फेसलेस पद्धतीने शुल्क भरणा करून आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची सुविधा राज्यभरातील सर्व परिवहन कार्यालयात कार्यान्वित करण्यात आलेली आहे.सदर सेवा पूर्णपणे फेसलेस स्वरूपाची असून अर्जदारास त्यासाठी आधार लिंक मोबाईल क्रमांकाचा वापर करून किंवा मोबाईल द्वारे O.T.P. घेऊन https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळाचा वापर करून नोंदणी क्रमांक आरक्षित करता येऊ शकेल तसेच सद्यःस्थितीत नवीन मालिका सुरू झाल्यानंतर होणारी लिलावाची कार्यपद्धती पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन राहील.

तसेच कार्यालयातील लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच उर्वरित नोंदणी क्रमांक ऑनलाईन फेसलेस पद्धतीने शुल्क भरून आरक्षित करता येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तरी, जास्तीत जास्त नागरिकांनी परिवहन विभागाच्या सदर फेसलेस सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांचेकडून करण्यात आले आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायटीमार्फत कंत्राटी पद्धतीने पदभरती

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**रायगड(प्रतिनिधी) :**
बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने रु.३/- लाख पर्यंत इतक्या रक्कमेची कामे विनानिविदा उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभाग जिल्हा स्तरावर काम वाटप समितीची स्थापना करण्यांत आली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यामध्ये खालील नमुद कंत्राटी कामे सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायटी मार्फत कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदभरती पुढीलप्रमाणे- अ.क्र.कार्यालयाचे नांव,कंत्राटी सेवेचे नांव,कामाचे ठिकाण, व कामाचा कालावधी
०१) जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग (खनिकर्म शाखा) लिपिक, पदसंख्या-०१ व शिपाईकम वाहनचालक-०१ अलिबाग-रायगड, कालावधी-११ महिने,
०२) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग-शिपाई पदसंख्या-०१, अलिबाग-रायगड
तसेच अ.क्र.०२ येथील कार्यालयाकरीता बेरोजगारांच्या सेवा सोसायटी मार्फत कंत्राटी सेवेकरीता पदवीधर अंश कालीन उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

तरी ज्या सेवा सोसायटयांचे कार्यक्षेत्र अलिबाग तालुक्याकरिता आहे अशा सेवा सोसायट्यांना कामाची आवश्यकता असल्यास उपरोक्त कंत्राटी काम मिळणेबाबतचे आपले प्रस्ताव दिनांक १६/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग या कार्यालयात स्वहस्ते सादर करावे. आवश्यक अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे. उशिरा प्राप्त झालेले तसेच अपुर्ण स्वरूपातील प्रस्ताव अपात्र ठरवून स्विकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी, अधिक माहितीस्तव या कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९ वर संपर्क साधावा.असे आवाहन सहायक आयुक्त, श्रीम. अ.मु. पवार, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांनी केलेले आहे.

## डॉ. समीर तोडणकर यांच्या हस्ते
# सेवानिवृत्त होणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांचा सन्मान





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज, दि. ०९ डिसेंबर, २०२४ रोजी, जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर यांच्या शुभहस्ते २३ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. समीर तोडणकर यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता सदिच्छा दिल्या. त्याचबरोबर ग्रामीण भागात ३८ पेक्षा अधिक काळ कामकाज केल्याबद्दल अभिनंदन केले. आरोग्य, शिक्षण तसेच विविध शासकीय योजना ग्रामस्थापर्यंत पोहोचवण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मोलाचे कामकाज केले आहे. यापुढे सेवानिवृत्ती नंतर स्वतःसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी वेळ द्या, अशा सदिच्छा दिल्या.

प्राथमिक शिक्षक जयदिप देशमुख व मिठाराम बोंद्रे यांनी जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार कार्यक्रम नियोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. ३८ वर्ष शिक्षक म्हणून कामकाज करता विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसापर्यंत शिकवण्याचा अनुभव समृध्द करणारा होता, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज देवकर तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ऑक्टोबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०७, सामान्य प्रशासन विभाग ०३, आरोग्य विभाग ०२ असे एकूण १२ तर नोव्हेंबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०९, आरोग्य विभाग ०२ असे जिल्हा परिषदेचे एकूण ११ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक, कनिष्ठ सहाय्यक, आरोग्य सहाय्यक महिला, वाहन चालक, शिपाई या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### महिला व बालकल्याण विभाग

**कन्यादान योजना व विधवा पत्नीस लॉटरी पध्दतीने अनुदान वितरित करणे**

**कन्यादान योजना**

**निराधार/ विधवा/परित्यक्त्या/घटस्फोटीत महिलांच्या मुलींचे विवाहाकरिता अनुदान देणे.**
**अनुदान रक्कम प्रति लाभार्थी रु.२०,०००/-**

**योजनेच्या अटी व शर्ती..........**
१.चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती जोडणे बंधनकारक आहे.कुटूंबांचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/मतदार यादीतील नांव/पाणीपट्टी/ वीज बिल/ आधारकार्ड/ ३ वर्षाचा भाडे करारनामा /पारपत्र (PASSPORT) रेशनकार्ड, विवाह नोंदणी दाखला, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल.
२.विधवा महिलेच्या पतीच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रमाणित प्रत परित्यक्त्या असल्याबद्दलचा पुरावा तसेच घटस्फोटीत महिलांना मा.न्यायालयात दावा दाखल केला असल्यास त्याबाबतची मा.न्यायालयाच्या निर्णयाची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.
३.अर्जदाराने पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
४.ज्या महिला निराधार/विधवा/परित्यक्त्या असून ज्यांनी पुनर्विवाह केलेला नाही.तसेच ज्या महिला न्यायालयाचे आदेशाप्रमाणे घटस्फोटीत असून ज्यांनी पुनर्विवाह केला नाही. अशा कुटुबांचे त्या कुटुंब प्रमुखाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. २,४०,०००/- च्या आत असलेबाबत मा. तहसिलदार कल्याण, याचा उत्पन्न दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.
५. निराधार / विधवा / घटस्फोटीत व परित्यक्त्या महिलेच्या मुलीचा विवाह झाल्यानंतर दोन वर्षाच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
६. मुलीचा विवाह नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७. मुलीचा विवाह झालेबाबत विवाहाचा फोटो अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.
८. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
९. जास्तीत जास्त दोन मुलीच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य मिळेल. तथापि एका आर्थिक वर्षात एका मुलीच्या विवाहास अर्थसहाय्य मिळले.
१०.अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-यांने प्रमाणित केलेली असावित.
११.दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजूर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहील.
१२.ज्या लाभार्थ्यांनी याआधी या योजनेचा लाभ घेतलेला आहे; अशा व्यक्तिंना या योजनेअंतर्गत अर्ज करता येणार नाही.
१३.बॅकेचे पासबुकची स्पष्ट छायांकित प्रत तसेच रदद केलेला धनादेश अर्जासोबत देणे.
सर्व कागदपत्रे ही सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन सादर करावीत.

**विधवा पत्नीस अनुदान**

घरातील कर्त्या पुरुषांचे निधन झाल्यांस त्याचे विधवा पत्नीस अनुदान देणे.
अनुदान रक्कम :- रु. प्रति लाभार्थी १०,०००/-
**योजनेच्या अटी व शर्ती..**
१) मृत व्यक्तीचे वय २१ ते ६५ वर्षाच्या दरम्यान असावे. मृत्यु झाल्यानंतर (२) वर्षाच्या आत अनुदानाचा अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. (जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकाच्या २ वर्षे आधी)
२) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणारे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. २,४०,०००/- चे आत असणे आवश्यक आहे. मा. तहसिलदार कल्याण, यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करावा.
३) चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती जोडणे बंधनकारक आहे.
४) कुटुंबाचे कल्याण महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटा पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.
५. ज्या लाभार्थ्यांनी याआधी या योजनेचा लाभ घेतलेला आहे अशा व्यक्तिंना या योजनेअंतर्गत अर्ज करता येणार नाही.
६. बॅकेचे पासबुकची स्पष्ट छायांकित प्रत तसेच रदद केलेला धनादेश अर्जासोबत देणे.
७. लाभार्थ्यांनी पुनर्विवाह केले नसल्याबाबतचे घोषणापत्र /सत्यप्रतिज्ञापत्र
८. सर्व कागदपत्रे ही सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन सादर करावीत.
**अंतिम दिनांक - ०८/०१/२०२५**

**सही/-**
**(स्वाती देशपांडे)**
**उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

**जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१९१०**
**दिनांक - ०९/१२/२०२४**


# ठाणे जिल्ह्यातील सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलन शुभारंभ होणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनाचा ठाणे जिल्ह्यातील शुभारंभ कार्यक्रम उद्या, मंगळवार, १० डिसेंबर रोजी सकाळी १२ वाजता ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षते खाली होणार आहे.
कार्यक्रमाला ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलीस अधिक्षक डी.एस. स्वामी, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कार्य केलेल्या संस्था, व्यक्तिंचा सत्कार तसेच माजी सैनिकांना कल्याणकारी निधीचे वाटप होणार आहे. या कार्यक्रमाला आजी-माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, माजी सैनिक पत्नी, पाल्य यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी प्रांजल जाधव यांनी केले आहे.

# विशेष अधिवेशनात ९ डिसेंबर रोजी ४ नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली सदस्यपदाची शपथ

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
विधानसभेच्या विशेष अधिवेशनात दि. ९ डिसेंबर रोजी ४ नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास निळकंठ कोळंबकर यांनी सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.
शपथ घेतलेल्या सदस्यांमध्ये सर्वश्री जयंत राजाराम पाटील, विनय विलासराव कोरे (सावकार), सुनील शंकरराव शेळके, उत्तम शिवदास जानकर यांचा समावेश आहे. या विशेष अधिवेशनाच्या कालावधीत एकूण २८३ सदस्यांनी सदस्यपदाची शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# सरपंच समिताताई संतोष सुरोशी राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित होणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**टिटवाळा (उमेश जाधव) :**
रायते-पिंपळोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. समिताताई संतोष सुरोशी यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश यांचे तर्फे ग्रामस्तरावरील आपल्या अतुलनीय, अविस्मरणीय व असामान्य योगदानाबद्दल अत्यंत प्रतिष्ठेचा व मानाचा राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान-२०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



मान कर्तृत्वाचा, सन्मान नेतृत्वाचा या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार-२०२४ शिर्डी लोकसभा मतदारसंघांचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे व कर्जत विधानसभा मतदारसंघांचे आमदार रोहित पवार यांच्या शुभहस्ते सोमवार, दि. २० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड, अहमदनर येथे प्रदान होणार आहे. कल्याण तालुक्यातील रायते नगरीसाठी ही अभिमानाची, कौतुकाची व गौरवाची बाब आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे कर्तबगार व कर्तृत्ववान स्त्रीचा हात असतो त्याच प्रमाणे प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे अत्यंत कार्याकुशल व कार्यतत्पर पुरुषाचा हात असतो. याच प्रमाणे रायते-पिंपळोली ग्रामपंचायतीच्या सरपंच समिताताई यांच्या मागे त्यांचे पती संतोष नामदेव सुरोशी यांचा हात आहे. त्यांच्यामुळेच मी राजकारण आणि समाजकारण शिकता आलं व कर्तृत्व सिद्ध करता आलं. असे मत समिताताई यांनी आपलं मत व्यक्त करताना सांगितले.

रायते नगरी भविष्यातील विकसित मुंबईचं प्रवेशद्वार ठरेल. राष्ट्रीय व राज्य महामार्गांच्या क्रॉसिंगमुळे महत्वाचं जंक्शन ठरेलं यांत तीळ मात्र शंका नाही. अशा या उदयोंमुख, उद्योमशील व उद्योगनगरीच्या एक कर्तव्यशालिनी महिला सरपंच म्हणून तमाम गावकरी वर्गास यांना आपल्याबद्दल प्रचंड आदर, आस्था व स्नेह आहे. रायते नगरीच्या सर्वांगीण, संतुलित व सर्वसमावेशक विकासासाठी आपण ट्वेंटी फोर बाय सेवन अवर्स उपलब्ध आहात. हीच रायते विकासाची नांदी ठरेल. आपल्या अफाट कर्तृत्वाचं, अजोड नेतृत्वाचं, अमोघ वक्तृत्वाचं असीम दातृत्वाचं फलित आहे. याचमुळे त्यांना पुरस्कार प्रदान होत असून त्यामुळे सरपंच यांना प्रेरणा व प्रोत्साहन देतात ते आपलं कर्तव्य व आपली जबाबदारी प्रामाणिकपणे निभावण्याचं काम यापुढे देखील करतील. याच कारणामुळे त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

# अॅड.राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधानसभा सदस्य अॅड. राहुल नार्वेकर यांची १५ व्या विधानसभेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अॅड. राहुल नार्वेकर यांच्या विधानसभा अध्यक्षपदासाठीच्या नावाचा प्रस्ताव सभागृहात मांडला. या प्रस्तावास सदस्य सर्वश्री अनिल पाटील, अॅड. आशिष शेलार, चंद्रकांत पाटील यांनी अनुमोदन दिले. यानंतर हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी अॅड.राहुल नार्वेकर यांच्या नावाचा विधानसभा अध्यक्ष पदासाठीचा प्रस्ताव संमत झाल्याची घोषणा केली. अॅड.राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.
अॅड. राहुल नार्वेकर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा सदस्य सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नाना पटोले, जयंत पाटील, नितीन राऊत हे अॅड. नार्वेकर यांना अध्यक्षपदी स्थानापन्न होण्यासाठी अध्यक्षपदाच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेवून गेले. सभागृहातील सर्व सदस्यांनी अॅड. नार्वेकर यांचे अभिनंदन केले.

# 'मोहन'स मार्शल आटर्स अँड फिटनेस प्लॅनेटच्या भव्य उद्धाटन सोहळा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण पश्चिमेत मोहन्स मार्शल आर्ट अँन्ड फिटनेस फ्लॅनेटच्या दुसऱ्या शाखेचे वेदांत पॅलेशिया वसंत व्हॅली येथे दिखामदार सोहळयात रविवारी उदाघाटन झाले. आजच्या धावपळीच्या युगात शरीर संपदा आणि फिटनेस ठेवणे काळाची गरज आहे. याच दुष्टीकोनातून मोहन'स मार्शल आर्ट्स अँड फिटनेस प्लॅनेटच्या माध्यमातून सुसज्ज असे मार्शल आर्ट, बॉक्सिंग, योगा या माध्यमातून आपली शरीर संपदा आणि फिटनेस कायम ठेवण्यासाठी दालन सुरू झाले आहे.



अत्याधुनिक फिटनेस आणि मार्शल आर्ट्स केंद्राच्या उद्घाटनाला समाजातील सर्वच स्तरातील मान्यवरांनी उपस्थित राहत शक्ती, शिस्त आणि आरोग्यवर्धनासाठी दिला जाणारा योगदानाचा भाग यानिमित्ताने बनले होते. या प्रसंगी मोहनस् मार्शल आर्ट्स अँड फिटनेस प्लॅनेटचे सीओओ रोहन सिंग यांनी

## तरूणांनी मार्शल आर्ट, बाँक्सिंग, योगा याकडे वळले पाहिजे - रोहन सिंग

आजच्या मोबाईलच्या युगात युवापिढी ही मोबाईल मध्ये तासनतास स्वतःला गुंतवून घेत असल्याचे दिसते. त्याचे दुष्परिणाम होतात आणि शरीरसंपदेकडे दुर्लक्ष होते. यासाठी तरूणाने मार्शल आर्ट, बाँक्सिंग, योगा याकडे वळले पाहिजे ज्यामुळे शरीर स्वास्थासह मनस्वास्थ देखील प्राप्त होईल असा संदेश दिला.
उदाघाटन सोहळ्या निमित्ताने बॉलीवूड फिल्मफेअर पुरस्कार विजेती ऋतिका सिंग यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ संपन्न झाला. रेन्शी मोहन सिंग (ब्लॅक बेल्ट - ६व्या डिग्री) यांच्याशी मार्शल आर्टचे प्रशिक्षण घेणाऱ्या नवशिक्या तरूणाईने संवाद साधला. या प्रसंगी कराटेपट्ठु आणि प्रशिक्षक फोझान नजे यांनी यानिमित्ताने उपस्थितांना कराटे प्रत्याक्षिक दाखवित महत्त्व पटवून दिले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी